# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, अ प्रभाग समिती

## सभावृत्तांत [ कार्यपत्रिका क्रमांक ६ ]

**दिनांक : १० /८/२०१६** **वेळ : दुपारी १२.०० वा.**

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग समितीची माहे ऑगस्ट २०१६ ची मासिक सभा बुधवार दिनांक १०/८/२०१६ रोजी दु. १२.०० वाजता अ क्षेत्रीय कार्यालयातील " **राजमाता जिजाऊ सभागृह** " येथे आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालील सन्मा. सदस्य/सदस्या उपस्थित होते.

1. मा. पांढरकर निलेश शंकरराव – सभापती
2. मा. बाबर शारदा प्रकाश
3. मा. आर.एस.कुमार
4. मा. जावेद रमजान शेख
5. मा. भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर
6. मा. नंदा विकास ताकवणे
7. मा. तरस बाळासाहेब जयवंत
8. मा. प्रसाद शेट्टी
9. मा. टेकवडे सुजाता अविनाश
10. मा. काळभोर वैशाली जालिंदर
11. मा. बेबीनंदा राम भोंडवे [ स्वीकृत सदस्या ]
12. मा. गिरीष गोपाळ कुटे [ स्वीकृत सदस्य ]

तसेच श्री. चंद्रकांत खोसे - क्षेत्रीय अधिकारी, श्री. फारुक शेख - कार्यकारी अभियंता, स्थापत्य, श्री लियाकत पीरजादे – कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा, श्रीम.रेखा गाडेकर - प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा), श्री प्रदीप पुजारी – प्रभारी कार्यकारी अभियंता झोनिपु, श्री.सुनिल वाघुंडे, श्री. अनिल शिंदे , श्रीम बाबर एल.एस., श्री वैभव पुसाळकर - उपअभियंता, श्री. गायकवाड पी.एम. – उदयान अधिक्षक, श्री राठोड एस.एस. - कनिष्ठ अभियंता , श्रीम डी डी गुमास्ते – कार्यालय अधिक्षक तथा अतिक्रमण प्रमुख, श्री. सासवडकर डी एस., श्री देसाई एस बी – मुख्य आरोग्य् निरिक्षक, श्री गायकवाड- आरोग्य् निरिक्षक , श्री कुंभार पी एस – हॉ. सुपरवायजर उपस्थित होते.

मा. सभापती , श्री. पांढरकर निलेश यांनी उपस्थित सन्मा. नगरसदस्य, नगरसदस्या व अधिकारी यांचे स्वागत करुन सभा सुरु करणेस अनुमती दिली.

सर्व प्रथम मागील सभेचा सभावृत्तांत [ दिनांक १३/७/२०१६ कार्यपत्रिका क्रमांक ५ ] वाचून कायम करणेत आला त्यानंतर सभापती यांचे परवानगीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.

**विषय क्रमांक ७ :** सन्मा. सदस्य , प्रसाद शेट्टी यांचा दि. १०/८/२०१६ चा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक २५ चिंचवड स्टेशन येथील मुंबई-पुणे बी.आर.टी.एस. मार्गावरील पदपथास **स्व. प्रशांत शंकर शेट्टी पादचारी पुल** असे नामकरण करणेस मान्यता देणे. तसेच सदरचे काम बी.आर.टी.एस. विभागाकडील चालू असलेल्या स्थापत्य विषयक कामातून करणेस मान्यता देणे.

**विषय क्रमांक ८ :** सन्मा. सदस्य , प्रसाद शेट्टी यांचा दि. १०/८/२०१६ चा प्रस्ताव

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने के.एस.बी. चौक चिंचवड याठिकाणी राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे भव्य असे शिल्प् उभारण्यात आलेले आहे. त्यास अनुसरुन उड्डान पुल उभारण्यात आलेला आहे. राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे कार्य व त्यांचे विचार जन माणसामध्ये रुजावे व भावी पिढीला त्यांची माहिती व्हावी याकरीता सदर उड्डान पुलास **राजर्षी छत्रपती शाहू महाराज** यांचे नाव देणेस मान्यता देणे.

**विषय क्रमांक ९ :** सन्मा. सदस्या, वैशाली काळभोर यांचा दि. १०/८/२०१६ चा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक २६ काळभोरनगर येथील कै. शंकर शेट्टी उदयानासमोरील नवीन विकसित ग्रंथालय व वाचनालयास **मरहूम फकिरभाई पानसरे वाचनालय व ग्रंथालय** असे नाव देणेस मान्यता देणे.

**विषय क्रमांक १० :** सन्मा. सदस्या, वैशाली काळभोर यांचा दि. १०/८/२०१६ चा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक २६ काळभोरनगर येथील सितानिवास समोरील रस्त्यास **कै. पै. किसनराव विष्णूपंत काळभोर मार्ग,** दिगंबर शेठ काळभोर निवास समोरील चौकास **कै. शंकर कुशाबा काळभोर चौक,** सितानिवास समोर **कै. सिता विष्णुपंत काळभोर प्रवेशद्वार [कमान]** , प्रभू चेंबर्स सोसा. समोर **कै. त्र्यंबक प्रभू काळभोर प्रवेशद्वार [कमान]** , शंकर शेट्टी उदयान बाहेरील गेटवर [ आठवडे बाजार ग्राऊंड समोरील गेट ] **कै. नारायण विष्णूपंत काळभोर प्रवेशद्वार [कमान] ,** सांस्कृतिक भवन समोरील रस्ता **कै. पै. सोपानराव [ तात्या] विष्णूपंत काळभोर प्रवेशद्वार [कमान]** , अन्सारी काटासमोर दिघे यांचे घराजवळ **कै. विष्णूपंत रामा काळभोर प्रवेशद्वार [कमान]** असे नामकरण करणेस मान्यता देणे.

**विषय क्रमांक ११ :** सन्मा. सदस्य, बाळासाहेब तरस यांचा दि. १०/८/२०१६ चा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक १८ किवळे प्रभागातील विविध नगरांचे नामकरण फलक पुढीलप्रमाणे लावणेबाबत विकासनगर [ दोन फलक ], श्री बापदेवनगर, श्रीनगर, कै. भिमराव रामभाऊ तरस नगर, पेंडसे कॉलनी, मीना कॉलनी, इंदिरा कॉलनी, लोटस वृंदावन सोसायटी, विकास कॉलनी, कोतवालनगर, भारतरत्न हौ. सोसायटी, किवळे गावठाण, तसेच मामुर्डी मधील साईनगर [दोन फलक ] , आझादनगर, आदर्शनगर, सिध्दार्थनगर इ. प्रमाणे फलक लावणेस मान्यता देणे.

**विषय क्रमांक १२ : सन्मा.** सदस्या चारुशिला कुटे यांचा दि**. १०/८/**२०१६ चा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक 15 दत्तवाडी मधील क्रांतीनगर परिसरातील मस्जिदजवळ सुर्यवंशी चौक तसेच महाराष्ट्र बँकेजवळ असणारे एफ.आर.पी. वाचनालय हे टवाळखोर मुलांसाठी बसण्याचा अड्डा झालेला असून त्याठिकाणी मुला-मुलींचे अश्लील चाळे चालू असतात. सदर परिसरातील नागरिकांना हया गोष्टीचा नाहक त्रास होत असल्यामुळे सदर वाचनालय लवकरात हटविण्यात यावे.

**विषय क्रमांक १३ :** सन्मा. सदस्य आर.एस.कुमार यांचा दि. १०/८/२०१६ चा प्रस्ताव

अ क्षेत्रीय कार्यालयातील पाणीपुरवठा विभागाचे अधिकारी / कर्मचारी यांनी पाणीपुरवठा विषयक चांगले कामकाज केले असल्याने त्यांचे अभिनंदन करणेचा ठराव करणेत यावा.

**विषय क्रमांक १३ :** सन्मा. सदस्या, वैशाली काळभोर यांचा दि. १०/८/२०१६ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक २६ काळभोरनगर मधील मोहनगर येथील संघवी कंपाऊंडच्या गेट समोरील मुतारीमुळे आसपासच्या पुर्ण परिसरात दुर्गंधी पसरली असून सदर मुतारीबाबत येथील रहिवासी, दुकानदार, ज्येष्ठ नागरीक व महिला यांच्या खूप तक्रारी येत् आहेत. सदर मुतारी ही रस्त्यातच येत असल्याने वाहतुकीस अडथळा होतो. सदर मुतारी पासून १०० मीटर मध्येच दुसरी मुतारी असल्याने संघवी कंपाऊंड समोरील सिमेंट काँक्रींटची मुतारी तातडीने काढणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

तसेच मुतारी ही E.S.I. हॉस्पिटलच्या गेट समोर असून ती दोन बाजुंनी फुटली असून तिला पाण्याची टाकी नसल्याने सदर परिसरात व E.S.I. हॉस्पिटल मध्ये दुर्गंधी पसरते. त्यामुळे सदर E.S.I. समोरील मुतारी दुरुस्त करणेस व पाण्याची टाकी बसविणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

वरील प्रमाणे ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेण्यात आले.

| | |
|---|---|
| ठराव क्रमांक : ३५ | विषय क्रमांक : १ |
| दिनांक : १०/८/२०१६ | विभाग : |
| सुचक : मा. आर एस कुमार | अनुमोदक : मा. भालेराव प्रतिभा |

संदर्भ : मा. प्रसाद शंकर शेट्टी यांचा दिनांक १३/०३/२०१५ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक २५ चिंचवड स्टेशन येथील पुणे-मुंबई रस्त्यालगत जगन्नाथ कॉम्पलेक्स हौ.सो. समोरील ६.०० मीटर रुंद रस्त्यास **"हस्तीमल शेठ गादिया मार्ग"** असे नामकरण करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

सदर विषयाचा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

| | |
|---|---|
| ठराव क्रमांक : ३६ | विषय क्रमांक : २ |
| दिनांक : १०/८/२०१६ | विभाग : |
| सुचक : मा. सुजाता टेकवडे | अनुमोदक : मा.प्रतिभा भालेराव |

संदर्भ : मा. संगितताई राजेंद्र भोंडवे यांचा दि. ९/१२/२०१५ रोजीचा प्रस्ताव.

शुभारंभ कॉलनी, स.नं. (१३१/२ व १३०/१ मधील) यास **शुभारंभ कॉलनी** असा नामफलक बसवून मिळणेबाबत विचार करणे.

सदर विषयाचा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

-------

ठराव क्रमांक : ३७ विषय क्रमांक : ३

दिनांक : १०/८/२०१६ विभाग :

सुचक : मा. प्रतिभा भालेराव अनुमोदक : मा. आर एस कुमार

संदर्भ : मा. चारुशीला कुटे, नगरसदस्या यांचा दिनांक १३/१/२०१६ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक १५ दत्तवाडी मधील नाना स्मृती मंगल कार्यालया मागील लक्ष्मी प्रोव्हीजन स्टोअर पासून ते चर्च पर्यंतच्या **रस्त्याला " कै. गणपतराव ज्ञानदेव चव्हाण "** तसेच उत्कर्ष क्लासेस ते सेंट्रल बँक या अंतर्गत रस्त्याला **" कै. चंपालाल जैन मार्ग "** तसेच विठ्ठल मंदिराच्या डाव्या बाजूने श्रीकृष्णनगर पर्यंत जाणा-या **रस्त्यास " कै. संपत उमाजी माने मार्ग "** व शंकर मंदिर ते कुटे वृंदावन सो. अंतर्गत असणा-या रस्त्याला **" कै. बाळासाहेब रंगनाथ जाधव मार्ग "** , आदर्श मित्र मंडळ समोरील रस्त्यास **" कै. ह. भ. प. चांगदेव दादा काकडे "** आणि विघ्नहर गणेश मंदिर ते दक्षिण मुखी मारुती मंदिर अंतर्गत रस्त्यास **" कै. सुषमाताई विनायक जोशी मार्ग "** असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

ठराव क्रमांक : ३८ विषय क्रमांक : ४

दिनांक : १०/८/२०१६ विभाग :

सूचक : मा.प्रतिभा भालेराव अनुमोदक : मा. सुमन नेटके

संदर्भ : मा. संगिताताई भोंडवे, नगरसदस्या यांचा दिनांक ९/३/२०१६ रोजीचा प्रस्ताव.

रावेत बीआरटीएस रोडवरती श्री. बबन शं. शेटे यांच्या घरा समोरील नगरसेविका सौ. संगिताताई राजेंद्र भोंडवे यांच्या नामफलकाशेजारील चौकास **" कै. ज्ञानदेव केसू भोंडवे चौक "** असे नाव देण्यात यावे. तसेच सोनटक्के वस्ती सर्व्हे १२/५ रावेत या ठिकाणी **" यशवंत नगर , सोनटक्के वस्ती "** असे नामकरण करणेत यावे.

सदर विषयाचा विचार पुढील सभेची वेळी करणेत यावा.

ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

ठराव क्रमांक : ३९ विषय क्रमांक : ५

दिनांक : १०/८/२०१६ विभाग :

सूचक : मा. आर एस कुमार अनुमोदक : मा. भालेराव प्रतिभा

संदर्भ :- मा. सविता साळुंके, नगरसदस्या यांचा दिनांक १५/६/२०१६ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक २७ मोरवाडीमध्ये निगडी दापोडी हा बीआरटीएस रस्ता जात आहे. या रस्त्यावर नजीकच्या भविष्यात बीआरटीएस बससेवा चालू करणेत येणार आहे. या रस्त्यावरील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर चौकामध्ये बँक ऑफ महाराष्ट्रचे समोर बीआरटीएस बसथांबा आहे. याठिकाणचे बसथांब्याला **पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर चौक / Punyashloak Ahilyadevi Holkar Chouk** असे नाव देणेबाबत विचार करणे व या करीता पुणे महानगर परिवहन महामंडळ [ PMPML ] कडून वेगळी मान्यता घेणेची वाट न पाहणेस मान्यता देणेत येत आहे .

**तसेच** याच चौकामधील ग्रेड सेपरेटरला **पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर समतल विगलक / Punyashloak Ahilyadevi Holkar Grade Separator** असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता कार्यवाही सुरु करणेत यावी.

ठराव सर्वानुमते मान्य झाला.

**-----**

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : ४० | विषय क्रमांक : ६ | |
| दिनांक | : १०/८/२०१६ | विभाग | : |
| सूचक | : मा. जावेद शेख | अनुमोदक | : मा. प्रतिभा भालेराव |

संदर्भ :- **सन्मा. सदस्य, जावेद शेख यांचा दि. १/८/२०१६ रोजीचा प्रस्ताव**

प्रभाग क्रमांक १५ दत्तवाडी- विठ्ठलवाडी मधील बालवाडी जवळील आदर्श मित्र मंडळ येथील रस्त्यास **कै. राजेश पगार पथ** असे नामकरण करणेस मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मान्य झाला.

**-----**

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : ४१ | विषय क्रमांक : ७ | |
| दिनांक | : १०/८/२०१६ | विभाग | : |
| सूचक | : मा. प्रसाद शेट्टी | अनुमोदक | : मा. मनिषा पवार |

संदर्भ :- **सन्मा. सदस्य, प्रसाद शेट्टी यांचा दि. १०/८/२०१६ रोजीचा प्रस्ताव**

प्रभाग क्रमांक २५ चिंचवड स्टेशन येथील मुंबई पुणे बी.आर.टी.एस. मार्गावरील पदपथास **स्व. प्रशांत शंकर शेट्टी पादचारी पुल** असे नामकरण करणेस तसेच सदरचे काम बी.आर.टी.एस. विभागाकडील चालू असलेल्या स्थापत्य विषयक कामातून करणेस मान्यता देण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता कार्यवाही सुरु करणेत यावी.

ठराव सर्वानुमते मान्य झाला.

**-----**

ठराव क्रमांक : ४२ विषय क्रमांक : ८

दिनांक : १०/८/२०१६ विभाग :

सूचक : मा. प्रसाद शेट्टी अनुमोदक : मा. मनिषा पवार

संदर्भ :- **सन्मा. सदस्य, प्रसाद शेट्टी यांचा दि. १०/८/२०१६ रोजीचा प्रस्ताव**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने के.एस.बी. चौक चिंचवड या ठिकाणी राजर्षी छत्रपती शाहु महाराज यांचे भव्य असे शिल्प् उभारण्यात आलेले आहे. त्यास अनुसरुन उड्डान पुल उभारण्यात आलेला आहे. राजर्षी छत्रपती शाहु महाराज यांचे कार्य व त्यांचे विचार जन माणसामध्ये रुजावे म्हणून व भावी पिढीला त्यांची माहिती व्हावी या करीता सदर उड्डान पुलास **राजर्षी शाहु महाराज** यांचे नाव देणेस मान्यता देण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता कार्यवाही सुरु करणेत यावी.

ठराव सर्वानुमते मान्य झाला.

**-----**

ठराव क्रमांक : ४३ विषय क्रमांक : ९

दिनांक : १०/८/२०१६ विभाग :

सूचक : मा. वैशाली काळभोर अनुमोदक : मा. सुजाता टेकवडे

**संदर्भ :- सन्मा. सदस्या, वैशाली काळभोर यांचा दि. १०/८/२०१६ रोजीचा प्रस्ताव**

प्रभाग क्रमांक २६ काळभोरनगर येथील कै. शंकर शेट्टी उदयानासमोरील नवीन विकसित ग्रंथालय व वाचनालयास **मरहूम फकिरभाई पानसरे वाचनालय व ग्रंथालय** असे नामकरण करणेस मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक : ४४ विषय क्रमांक : १०

दिनांक : १०/८/२०१६ विभाग :

सूचक : मा. वैशाली काळभोर अनुमोदक : मा. सुजाता टेकवडे

**संदर्भ :- सन्मा. सदस्या, वैशाली काळभोर यांचा दि. ९/८/२०१६ रोजीचा प्रस्ताव**

प्रभाग क्रमांक २६ काळभोरनगर येथील सितानिवास समोरील रस्त्यास **कै. पै. किसनराव विष्णूपंत काळभोर मार्ग,** दिगंबर शेठ काळभोर निवास समोरील चौकास **कै. शंकर कुशाबा काळभोर चौक,** सितानिवास समोर **कै. सिता विष्णुपंत काळभोर प्रवेशद्वार [कमान]** , प्रभू चेंबर्स सोसा. समोर **कै. त्र्यंबक प्रभू काळभोर प्रवेशद्वार [कमान]** , शंकर शेट्टी उदयान बाहेरील गेटवर [ आठवडे बाजार ग्राऊंड समोरील गेट ] **कै. नारायण विष्णूपंत काळभोर प्रवेशद्वार [कमान] ,** सांस्कृतिक भवन समोरील रस्ता

**कै. पै. सोपानराव [ तात्या] विष्णूपंत काळभोर प्रवेशद्वार [कमान]** , अन्सारी काटासमोर दिघे यांचे घराजवळ **कै. विष्णूपंत रामा काळभोर प्रवेशद्वार [कमान]** असे नामकरण करणेस मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मान्य झाला.

**-----**

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : ४५ | विषय क्रमांक | : ११ |
| दिनांक | : १०/८/२०१६ | विभाग | : |
| सूचक | : मा. वैशाली काळभोर | अनुमोदक | : मा. सुमन नेटके |

**संदर्भ :- सन्मा. सदस्य, बाळासाहेब तरस यांचा दि. १०/८/२०१६ रोजीचा प्रस्ताव**

प्रभाग क्रमांक १८ किवळे प्रभागातील विविध नगरांचे नामकरण फलक पुढीलप्रमाणे लावणेस मान्यता देण्यात येत आहे. विकासनगर [ दोन फलक ], श्री बापदेवनगर, श्रीनगर, कै. भिमराव रामभाऊ तरस नगर, पेंडसे कॉलनी, मीना कॉलनी, इंदिरा कॉलनी, लोटस वृंदावन सोसायटी, विकास कॉलनी, कोतवालनगर, भारतरत्न हौ. सोसायटी, किवळे गावठाण, तसेच मामुर्डी मधील साईनगर [दोन फलक ] , आझादनगर, आदर्शनगर, सिध्दार्थनगर इ. प्रमाणे फलक लावणेस मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मान्य झाला.

**-----**

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : ४६ | विषय क्रमांक | : १२ |
| दिनांक | : १०/८/२०१६ | विभाग | : |
| सूचक | : मा. प्रसाद शेट्टी | अनुमोदक | : मा. जावेद शेख |

**संदर्भ :- सन्मा. सदस्या, चारुशिला कुटे यांचा दि. १०/८/२०१६ रोजीचा प्रस्ताव**

प्रभाग क्रमांक 15 दत्तवाडी मधील क्रांतीनगर परिसरातील मस्जिदजवळ सुर्यवंशी चौक तसेच महाराष्ट्र बँकेजवळ असणारे एफ.आर.पी. वाचनालय हे टवाळखोर मुलांसाठी बसण्याचा अड्डा झालेला असून त्याठिकाणी मुला-मुलींचे अश्लील चाळे चालू असतात. सदर परिसरातील नागरिकांना ह्या गोष्टीचा नाहक त्रास होत असल्यामुळे सदर वाचनालय लवकरात हटविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मान्य झाला.

**-----**

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : ४७ | विषय क्रमांक | : १३ |
| दिनांक | : १०/८/२०१६ | विभाग | : |
| सूचक | : मा. आर.एस.कुमार | अनुमोदक | : मा. जावेद शेख |

**संदर्भ :- सन्मा. सदस्य, आर.एस. कुमार यांचा दि. १०/८/२०१६ रोजीचा प्रस्ताव**

अ प्रभाग कार्यालयातील पाणीपुरवठा विभागाचे अधिकारी व कर्मचारी यांनी पाणीपुरवठा विषयक चांगले कामकाज केल्याने त्यांचे अभिनंदन करणेबाबत ठराव मंजुर करणेत येत आहे.

ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : ४८ | विषय क्रमांक | : १४ |
| दिनांक | : १०/८/२०१६ | विभाग | : |
| सूचक | : मा. वैशाली काळभोर | अनुमोदक | : मा. सुजाता टेकवडे |

**संदर्भ :- सन्मा. सदस्या, वैशाली काळभोर यांचा दि. १०/८/२०१६ रोजीचा प्रस्ताव**

प्रभाग क्रमांक २६ काळभोरनगर मधील मोहनगर येथील संघवी कंपाऊंडच्या गेट समोरील मुतारीमुळे आसपासच्या पुर्ण परिसरात दुर्गंधी पसरली असून सदर मुतारीबाबत येथील रहिवासी, दुकानदार, ज्येष्ठ नागरीक व महिला यांच्या खूप तक्रारी येत् आहेत. सदर मुतारी ही रस्त्यातच येत असल्याने वाहतुकीस अडथळा होतो. सदर मुतारी पासून १०० मीटर मध्येच दुसरी मुतारी असल्याने संघवी कंपाऊंड समोरील सिमेंट काँक्रींटची मुतारी तातडीने काढणेस मान्यता देण्यात येत आहे.

तसेच मुतारी ही E.S.I. हॉस्पिटलच्या गेट समोर असून ती दोन बाजुंनी फुटली असून तिला पाण्याची टाकी नसल्याने सदर परिसरात व E.S.I. हॉस्पिटल मध्ये दुर्गंधी पसरते. त्यामुळे सदर E.S.I. समोरील मुतारी दुरुस्त करणेस व पाण्याची टाकी बसविणेस मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मान्य झाला.

वरील प्रमाणे अ प्रभाग समितीच्या मासिक सभेचे कामकाज होऊन मा.सभापती यांनी प्रस्तुत ची सभा संपलेचे जाहीर केले.

सही/-
( निलेश शंकरराव पांढरकर )
सभापती
अ प्रभाग समिती

क्र. अक्षेका /११/कावि/३५०/२०१६
दिनांक : ८ /९/२०१६

सही/-
प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
अ प्रभाग समिती
निगडी - 44

प्रति, सर्व संबंधित विभाग